अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर
स्टोअर विभाग जा.क्र. - 50
दिनांक. 06 / 05 /2026

# अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर

## - बाजार भावाबाबत कोटेशन दरपत्रक नोटीस -

कळविण्यात येते की,**अहिल्यानगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभागा करिता सन.2026-2027 या आर्थिक वर्षा करिता खालील प्रमाणे साहित्य जरुरी प्रमाणे पुरवठा करणेकामी दोन लिफाफे पध्दतीने कोटेशन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.**

| अ.नं. | मालचा तपशिल | अंदाजे लागणारा माल |
|---|---|---|
| 1) | ॲलम(तुरटी) ग्रेड - I ब्लॉक<br>गुणवत्ता IS 299:1989<br>(4 थे रिव्हीजन) | 40 मे.टन. |
| 2) | ब्लिचिंग (TCL) पावडर ग्रेड - I<br>25 किलो पॅकिंगमध्ये<br>गुणवत्ता IS 1065:1989<br>उपलब्ध क्लोरीन कमीत कमी 33% | 25 किलो x 300 बॅग |

1)कोटेशन दरपत्रक सादर करताना ते दोन लिफाफे पध्दीतीने सादर करणे बंधनकारक आहे.लिफाफा क्र.1 मध्ये आवश्यक कागदपत्र सादर करण्यात यावीत सदर लिफाफ्यावर कोटेशन दरपत्रकाचा तांत्रिक कागदपत्रंचा लिफाफा असे मोठया अक्षरात नमुद करण्यात यावे तसेच लिफाफा क्र.2 मध्ये साहित्याचा तपशिल नमुद करुन ॲलम (तुरटी) साठी प्रती 1 मे.टन व ब्लिचिंग (TCL) पावडर साठी 25 किलो x 1 बॅग याप्रमाणेचा दर नमुद करण्यात यावा तसेच सदर लिफाफ्यावर कोटेशन दराचा व्यापारी लिफाफा असे मोठया अक्षरात नमुद करण्यात यावे नंतर दोन्हीही लिफाफे एका तिस-या लिफाफ्यामध्ये टाकून सदर लिफाफ्यावर प्रति, प्रेषक इ.नमुद करुन सदरचे दरपत्रक स्टोअर विभाग,अहिल्यानगर महानगरपालिका कार्यालयामध्ये मुदतीत दाखल करण्यात यावे.

2)कोटेशन दरपत्रकाच्या लिफाफा क्र.1 मध्ये म्हणजेच तांत्रिक लिफाफ्यामध्ये पुढील प्रमाणे कागदपत्र असणे आवश्यक आहे. - **GST (जी.एस.टी.) नोंदणी प्रमाणपत्र, निविदाकार हा जर व्यापारी घटक असेल तर ज्या उत्पादकाच्या वस्तुकरिता त्यांने निविदा भरली आहे अशा उत्पादकाचे प्राधिकारपत्र (ऑथरायझेशन), PAN (पॅन) कार्ड व मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 नुसार संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची किंवा उदयम नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.**

3)रुपये पंन्नास हजार ते पाच लक्ष पर्यंतच्या खरेदीस रक्कम रुपये पाचशे अधिक पाच लाख रुपयांचे वरील प्रत्येकी एक लाखासाठी किंवा त्याच्या भागासाठी रक्कम रुपये तिनशे फक्तचे स्टँम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

4)वर्णनाप्रमाणे मालाचा पोहोच पुरवठा स्वखर्चाने अहिल्यानगर महानगरपालिकेचे सूचनेप्रमाणे प्रत्यक्ष विळद व वसंत टेकडी येथील जलशुध्दी करण केंद्राच्या ठिकाणी करावा लागेल.

5)पूरवठा करण्यात आलेल्या साहित्याचे गुणवत्तेबाबतचा तपासणी अहवाल शासन मान्य प्रयोगशाळे मार्फत स्व:खर्चाने सादर करावा लागेल. तपासणी कामी येणा-या खर्चाची जबाबदारी ही महानगरपालिकेवर राहणार नाही.

6)कोटेशन मध्ये नमुद दर हे वाहतुक खर्च, बांधणी खर्च, चढ उतार खर्च, GST इ.सर्व कर समाविष्ठ तसेच साहित्य अहिल्यानगर महानगरपालिका येथे पोहोच पूरवठयासहचे असावेत.

तरी सदर मालाचे बाजारभाव सिलबंद पाकीटात दिनांक.06 /05 /2026 ते दिनांक. 12 / 05 /2026 रोजी — वाजेपर्यंत स्टोअर विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका कार्यालयात समक्ष दाखल करावेत.

Digitally signed by
SHAHAJAHAN BURAN TADAVI
Date: 06-05-2026 11:22:32

उपायुक्त (कर)
अहिल्यानगर महानगरपालिका

**प्रत** :- संगणक विभाग प्रमुख,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची नोटीस मनपाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याव यावी.

**प्रत** :- हवलदार,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची नोटीस मनपा नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी.